महाराष्ट्री प्राकृत

# मरहट्टी सरिआ

## इयत्ता बारावी



# भारताचे संविधान

**भाग ४ क**

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३०.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## महाराष्ट्री प्राकृत

# मरहट्ठी सरिआ

## इयत्ता बारावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११००४

H9L3F8

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०
पहिले पुनर्मुद्रण : २०२२

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‍धृत करता येणार नाही.

**महाराष्ट्री प्राकृत भाषा तज्ज्ञ समिती**

डॉ. सदानंद मोरे (अध्यक्ष)
डॉ. कमलकुमार जैन (सदस्य)
डॉ. राजश्री मोहाडीकर (सदस्य)
डॉ. विमल बाफना (सदस्य)
डॉ. आर. टी. पाटील (सदस्य)
डॉ. मैत्रेयी देशपांडे (सदस्य)
डॉ. श्रीनंद बापट (सदस्य)
डॉ. महावीर शास्त्री (सदस्य)
श्री. बाळकृष्ण जोशी (सदस्य)
श्रीमती मेघा कढे(सदस्य)
श्रीमती प्राजक्ता धर्मराव(सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)

**निर्मिती**

**श्री. सच्चिदानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी

**श्री. राजेंद्र चिंदरकर**
निर्मिती अधिकारी

**श्री. राजेंद्र पांडलोसकर**
सहायक निर्मिती अधिकारी

**संयोजन**
**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी.
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**प्रकाशक**
**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

| | | |
|---|---|---|
| चित्रकार | : | श्री. तेजस गोगावले |
| मुखपृष्ठ | : | श्री. तेजस गोगावले |
| अक्षरजुळणी | : | भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे |
| कागद | : | |
| मुद्रणादेश | : | |
| मुद्रक | : | |

# भारहस्स संविहाणं

## उद्देसिआ

अम्हे, भारहस्स जणा, भारहं संपुण्ण-पहुत्त-संपण्णं,

समाअवाइं, धम्मणिरवेक्खं, लोअतंतिअं गणरज्जं विहाउं,

तस्स समत्ता णाअरिओ अ

सामाइयं, अत्थिअं, राजणेइअं च णायं,

विआरस्स, अहिवत्तीए, अत्थाए, धम्मस्स, उवासणाए अ सातंतं,

पइट्ठाए, अवसरस्स अ समाणअं पाऊणिउं;

तेसु सव्वेसु अ

वत्तिगारवस्स रट्ठस्स अ एकआए,

अखंडआए अ सुणिच्छाइअं बंधुअं पवड्ढिउं;

कयदढसंकप्पा एआए अम्हाणं संविहाणसहाए

अज्ज, ईसवीए १९४९ तमे वस्से नवंबरमासस्स २६ तमे दिणे

(२००६ - तमे विक्कमसंवच्छरे मग्गसीसमासस्स सुक्कपक्खे सत्तमी-तिहीए)

एएण इणं संविहाणं अंगीकअं, अहिणियमिअं, अप्प-अप्पियं च करेमो।

## रट्ठगीअं

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे।।

## पइण्णा

भारहो मम देसो अत्थि ।
सव्वे भारहवासिणो मज्झ बंधुणो संति ।
मज्झ देसम्मि मम पेम्ममत्थि ।
मज्झ देसंसि विज्जमाणाणं
समिद्धाणं विविहआए विहूसिआणं च
परंपराणं मे अहिमाणो अत्थि ।
ताणं परंपराणं रक्खओ होउं समत्थो होज्ज त्ति
अहं णिच्चं पअत्तं करिस्सामि ।
अहं मज्झ पालआणं गुरुअणाणं जेट्ठाणं च।
सम्माणं काहिमि, पच्चेकेण सद्धिं
सुअणत्तणेण य आयरिस्सामि।
मम देस–बंधवाणं च णिट्ठारक्खणस्स अहं पइण्णं करेमि।
तेसिं कल्लाणे समिद्धीए अ
मज्झ सोक्खं समाविट्ठं भवइ ।

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता बारावीच्या वर्गात तुम्हा सर्वांचे स्वागत आहे. महाराष्ट्री प्राकृत भाषेतील 'मरहट्ठी सरिआ' हे इयत्ता बारावीचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देतांना खूप आनंद होत आहे. हे पाठ्यपुस्तक तुम्हाला निश्चितच आवडेल असा विश्वास वाटतो.

इयत्ता अकरावीच्या पाठ्यपुस्तकामध्ये मराठी व महाराष्ट्री प्राकृत यांचा जवळचा संबंध कसा आहे हे आपण पाहिले आहे. 'महाराष्ट्री प्राकृत' हे आधुनिक मराठीचे प्राचीन रूप आहे. त्यामुळेच मराठी भाषेला 'अभिजात भाषा' असे म्हणता येते. 'मरहट्ठी सरिआ' या पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून महाराष्ट्री प्राकृतची ओळख जास्त दृढ होईल, हे निश्चित. तृतीय ऐच्छिक भाषा या विषयासाठी हे पुस्तक इयत्ता बारावीसाठी तयार केले आहे. हाच धागा पकडून आपण महाराष्ट्री प्राकृतचा पुढील अभ्यास करणार आहोत.

आपले विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे भाषा हे अत्यंत प्रभावी साधन आहे, हे जरी खरे असले तरी त्या त्या भाषेतील विशिष्ट वाक्यरचना, म्हणी, शब्द इत्यादींच्या समर्पक उपयोगामुळे भाषा अजूनच समृद्ध व प्रभावी होते, हे ही तेवढेच खरे. यासाठी प्राकृत भाषेतील विविधअंगी साहित्य अभ्यासण्याने आपल्याला प्राकृत व मराठी दोन्ही भाषांचा समृद्ध व प्रभावी वापर करता येईल.

या पाठ्यपुस्तकामध्ये जे पाठ, कविता निवडल्या आहेत, त्यामध्ये प्राचीन काळातील बुद्धिचातुर्य, व्यवसायकौशल्य, व्यवहारचातुर्य यांच्याशी निगडित कथा निवडल्या आहेत. या कथांच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांमध्ये निश्चितपणे व्यवहार, आर्थिक निर्भरता आणि व्यवसाय यातील खाचाखोचा समजून बुद्धिचातुर्य व व्यवहारचातुर्य वाढीला लागेल, हे नक्की.

प्रत्येक पाठासंबंधी अधिक माहिती देण्यासाठी ॲपच्या माध्यमातून क्यू.आर. कोडद्वारे उपयुक्त दृकश्राव्य साहित्य आपणास उपलब्ध होईल. त्याचा तुम्हांला अभ्यासासाठी निश्चितच उपयोग होईल.

भाषिक विकासाबरोबरच विचारक्षमता, अभिव्यक्ति-कौशल्ये आणि सृजनशीलता यांच्या विकासासाठी उपयुक्त असलेले हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्की आवडेल, असा विश्वास आहे.

**विवेक गोसावी**
(संचालक)
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२०
भारतीय सौर दिनांक : २ फाल्गुन, १९४१

## भाषाविषयक क्षमता : महाराष्ट्री प्राकृत

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्री प्राकृत भाषाविषयक खालील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| **श्रवण** | • प्राकृत साहित्यातील संदर्भ, भाव व अर्थ समजून घेता येणे.<br>• प्राकृतांतील विविध साहित्यप्रकारांचे ध्वनिमुद्रित साहित्य ऐकून त्यातील स्वराघात, आरोह-अवरोह इत्यादी वैशिष्ट्यांची जाण होणे.<br>• प्राकृत भाषेतील औपचारिक व अनौपचारिक संभाषण व संवाद ऐकून त्यात सहभागी होता येणे.<br>• परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषांचे ज्ञान आणि त्यांच्या वैशिष्ट्यांची तुलना करता येणे. |
| **भाषण-संभाषण** | • उच्चार-विशेषानुसार महाराष्ट्री-प्राकृतांतील योग्य असे गाथांचे पठन आणि संभाषण करता येणे.<br>• कथासाहित्याच्या वैशिष्ट्यानुसार कथा-कथन व प्रबोधन करता येणे.<br>• विषयाला अनुसरून महाराष्ट्री प्राकृत माध्यमातून अनुभव कथन करता येणे. प्राकृतचा अभ्यास करून विविध शब्द, म्हणी अथवा वाक्प्रचार यांच्या भेंड्या सारखे खेळ खेळता येणे.<br>• विविध शब्दांची योजना करून प्राकृत भाषेत चर्चा करता येणे. |
| **वाचन** | • विरामचिह्नांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>• प्राकृत साहित्यातील विविध साहित्यप्रकारांचा आस्वाद घेणे.<br>• भाषेच्या अध्ययनाने प्राचीन महाराष्ट्रीय व भारतीय-संस्कृती समजून घेणे.<br>• संकेतस्थळांवर उपलब्ध असलेल्या 'ई' साहित्याचे वाचन करून त्या माहितीचा उपयोग स्वयंअध्ययनासाठी करता येणे. |
| **लेखन** | • लेखनाची पद्धती जाणून शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे.<br>• भाषा नियमांना अनुसरून निबंध/संवाद/वर्णन/लघुपरिच्छेद लिहिता येणे.<br>• माध्यम भाषेतील भाषा नियमाला अनुसरून अनुवाद करता येणे. |
| **अध्ययन कौशल्य** | • प्राकृतात होणारे स्वर, मुळाक्षर आणि जोडाक्षरांचे बदलसंबंधी नियम समजून घेणे.<br>• कोणत्याही संदर्भासाठी शब्दाची व्युत्पत्ती करणे व शब्दकोश पाहता येणे. प्राकृत भाषेत शब्दकोडे निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.<br>• प्राकृत भाषेत कथापूर्ती आणि अनुवाद करता येणे.<br>• अध्ययनाकरिता संगणकीय साहित्याचा उपयोग करता येणे. |
| **भाषाभ्यास** | • अकरावीत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे. शब्दसंपत्ती, तत्सम,तद्‌भव, देशी, समानार्थी, विरुद्धार्थी, विभक्तीप्रत्यय, काल-प्रत्यय.<br>• कर्तरि-कर्मणी प्रयोग, विशेष्य-विशेषण, समास एवं वृत्तज्ञान करून घेऊन त्यांचा उपयोग करता येणे.<br>• प्राकृत आणि देशी व मातृभाषेतील शब्दांचा तुलनात्मक अभ्यास करणे.<br>• महाराष्ट्री-प्राकृत भाषेत संवाद करणे.<br>• एअतीस ते सय/सअअ (३१-१००) अंक (क्रम) जाणून घेणे. |

# शिक्षकांसाठी

इयत्ता बारावीचे महाराष्ट्री प्राकृतचे 'मरहट्ठी सरिआ' हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपल्या हातात देतांना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांची भाषिक तसेच व्यावहारिक कौशल्ये विकसित होण्यासाठी या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांना रुचतील, आवडतील, उपयुक्त ठरतील अशा  पाठांचा, कवितांचा, कृतींचा समावेश केला आहे. पाठांना अनुरूप चित्रांचाही अंतर्भाव केला आहे. या बाबींचा तसेच पाठांचा गाभा समजून घेऊन शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून भाषिक तसेच  व्यावहारिक कृती करून घ्याव्यात.

क्षमता विधानातील भाषाभ्यास या घटकाकडे शिक्षकांनी विशेष लक्ष पुरवावे. या घटकाखाली येणाऱ्या व्याकरणाचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घेण्यासाठी शिक्षकांनी वेगवेगळ्या युक्त्यांचा उपयोग करावा. जसे तक्ते, कोष्टके, चित्रे पूर्ण करणे, भरणे इ. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठातील कठीण शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करायला उद्युक्त करावे, जेणेकरून एका शब्दाचे अनेक अर्थ व छटासुद्धा विद्यार्थ्यांच्या लक्षात येतील.

भाषेची आवड व गोडी निर्माण होण्यासाठी रोजच्या व्यवहारातील, वापरातील, उपयोगातील  मराठीतील शब्दांशी साम्य असणारे प्राकृत शब्द शोधून काढणे, ते शब्द प्राकृतमधून  मराठीत  येतांना  काय  बदल  होतात ते सांगितल्याने विद्यार्थ्यांना वेगळीच गंमत वाटेल. उदा. नक्क पासून नाक, तक्क पासून ताक, चक्क पासून चाक.

या पुस्तकातील बहुतेक पाठ मूळ जैन प्राकृत ग्रंथातून घेतले असल्याने तिथे असलेल्या 'य' श्रुती (क,ग,च,ज,त,द,प) च्या ऐवजी बहुतांश ठिकाणी अ ठेवला आहे तसेच न चा ण केला आहे. तसेच बहुतांश ठिकाणी महाराष्ट्री प्राकृत व मराठी भाषेतील ल/ळ या दोन्हींचाही वापर केला आहे.

प्राकृत साहित्यातील ग्रंथसंपदा jain e-library स्वरूपात उपलब्ध आहे.(उदा. https://jainelibrary.org/book-detail/?srno=001669) त्यांचाही उपयोग अभ्यासाकरिता हिताचा ठरेल. ज्या ग्रंथातून पाठ निवडले आहेत, ते मूळ ग्रंथ शिक्षकांनी स्वतः पहावेत तसेच विद्यार्थ्यांनासुद्धा दाखववेत.

# – अनुक्रमणिका –


| अनु.क्र. | | पान.क्र. |
|---|---|---|
| | सुगम प्राकृत | १ |
| | **गज्ज विहाओ** | |
| १) | मरहट्ठी भासाए गोरवं | ९ |
| २) | ववहारकुसलो हालिओ | १२ |
| ३) | अभयदाणं | १६ |
| ४) | णाअसीलो मेहरो | २० |
| ५) | चंडचूडस्स णियमो | २४ |
| ६) | कम्म–परिणामो | २७ |
| ७) | सिप्पिपुत्तो | ३० |
| | **पज्ज विहाओ** | |
| १) | सुहासिआइं | ३३ |
| २) | लोहस्स परिणामो | ३७ |
| ३) | पइट्ठाण–णअरं | ४१ |
| ४) | मूलदेव–धुत्तस्स अक्खाणअं | ४५ |
| ५) | वज्ज–परिक्खा | ४८ |
| ६) | फुल्ल–विण्णाण–कुसला तरंगलोला | ५१ |
| ७) | साहसवज्जा | ५५ |
| | **व्याकरण विवेचन** | |
| | १) विध्यर्थकाचे प्रत्यय आणि क्रियापदाची रूपे<br>२) क्रियापदांची कर्मणी रूपे व प्रयोग<br>३) प्रयोजक विचार<br>४) तर–तम–भाव दर्शक विशेषणे<br>५) उपसर्ग<br>६) समास–विवेचन<br>७) अव्यय<br>८) संख्याविशेषणे | ५८ |
| परिशिष्ट १–अवांतर वाचन | | ७७ |
| परिशिष्ट २–लेखन कौशल्य – २.१) संवाद लेखन २.२) पत्र लेखन २.३ ) निमंत्रण लेखन २.४) बातमी | | ८२ |
| परिशिष्ट ३–निबंध लेखन | | ८७ |
| परिशिष्ट ४– प्राकृत साहित्य प्रकार | | ८९ |
| परिशिष्ट ५–काही नित्योपयोगी व आवश्यक प्राकृत क्रियापदे | | ९४ |

# सुगम प्राकृत

## क्रियापदे


कड्ढइ


चलइ


पिवइ


धरइ


उवएसइ


अच्चइ


मारेइ



ठाइ


उवविसइ


सुवइ/सोवइ


हसइ


वियरइ


आमंतेइ


तरइ


देइ


सम्माणेइ


कीलइ


कुप्पइ


पडइ


गायइ



कंडूयइ



जग्गइ



बीहइ



दंसेइ



पासइ



णमइ



धावइ



भमइ



पविसइ



खिवेइ

## तीन काळांची वाक्ये



माआ ओअणं पचइ ।



माआ ओअणं पचित्था ।



माआ ओअणं पअइस्सइ ।



सीआ मालं गुंफेइ ।



सीआ मालं गुंफित्था ।



सीआ मालं गुंफिस्सइ ।



तुमे अंबं भक्खेसि ।



तुमे अंबं भक्खित्था ।



तुमे अंबं भक्खिस्ससि ।



वाणरो रुक्खे चडइ ।



वाणरो रुक्खे चडित्था ।



वाणरो रुक्खे चडिस्सइ ।



छत्ता पुत्थआणि पढंति ।



छत्ता पुत्थआणि पढिंसु ।



छत्ता पुत्थआणि पढिस्संति ।



अहं विज्जालअं गच्छामि ।



अहं विज्जालअं गच्छित्था ।



अहं विज्जालअं गमिस्सामि ।



साहू धम्मं कहेइ ।



साहू धम्मं कहित्था ।



साहू धम्मं कहिस्सइ ।

## ऋतू (उऊ)



वसंतो



गिम्हो



वरिसा



सरओ



हेमंतो



सिसिरो

# दिशा







# चित्रमालिका

१)


सव्वे छत्ता सालं आगच्छंति

→


सालाए पत्थणा होइ

→


कक्खाए सव्वे छत्ता उवविसंति

→


अज्झावओ पाढं पाढेइ

→


अज्झयणाणंतरं भोयणावकासो होइ

२)


अहं णिद्दाए जग्गामि

→


अहं भोयणं करेमि

→


अहं सालं गच्छामि

→


अहं अज्झयणं करेमि

→


अहं मित्तेहिं सह कीलामि

३)  →  → 

किसीवलो पभाए घरकज्जं करेइ

खेत्ते गच्छइ

हलं कड्ढइ

→  → 

भोयणं करेइ

गिहं आगच्छिऊण सुवइ

४)  →  → 

रामेण धणुहभंगं कयं

राम-सीयाए विवाहो

रामस्स सीया-लक्खणेहिं सह वणवासो

→  → 

रावणेण सीयाहरणं कयं

रावणवहं

५)  →  → 

कण्हजम्मो

महुराणयरिं गमणं

कंसवहो

→  → 

सिसुवालवहो

महाभारहजुद्धं

# सज्झाओ

## १) चित्रे पाहून त्यासाठी वापरले जाणारे क्रियापद सांगा.

१) 

४) 

२) 

५) 


३) 

६) 

## २) चित्रे पाहून वाक्याचा काळ सांगा.

१) 

३) 

२) 

४) 

## ३) रेखाजाल पूर्ण करा.

१) 


२) 


३) 


## ४) दिशा पाहून रिकाम्या जागा भरा.



५) गोलातील सूचनेप्रमाणे रिकाम्या जागा भरून रेखाजाल पूर्ण करा.

१)




२)




३)




४)




६) चित्रांचा अर्थसंगत क्रम लावा.

१)







२)







३)







# १) मरहट्ठी भासाए गोरवं

मराठी आणि महाराष्ट्री प्राकृत भाषेचा खूप जवळचा संबंध आहे. आज आपण जी मराठी भाषा बोलतो तिचे महाराष्ट्री प्राकृत हे मूळ रूप आहे. या प्राचीनतेमुळेच आपण मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणू शकतो. एकमेकांशी संवाद साधण्यासाठी, आपले विचार, मते, कल्पना, भावभावना व्यक्तीसमोर योग्य आणि प्रभावीपणे मांडण्यासाठी त्या भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे. या पाठामध्ये याच महाराष्ट्री प्राकृत भाषेची माहिती सांगितली आहे.

महाराष्ट्री प्राकृत भाषा शिकण्यास सोपी असून सर्वांना उपयोगाची आहे असे शिक्षिका विद्यार्थ्यांना सांगत आहेत. प्राचीन काळी महाराष्ट्री प्राकृत भाषा सामान्य लोकांची बोलीभाषा होती. या भाषेमध्ये व्याकरण, कथा, गद्य-पद्यमय चंपू व इतर साहित्यसुद्धा रचले गेले आहे.



**राहिआ-** आअरिआ ! अम्हे मरहट्ठी पाइअभासा सिक्खिउं इच्छामो। किं मरहट्ठी पाइअभासा कढिणा अत्थि ?

**अज्झाविआ-** वच्छे राहिआ! णत्थि णत्थि। मरहट्ठी पाइअभासा अच्चंता सुलहा सरला अ।

**रोहिओ-** आअरिआ! अज्ज मरहट्ठी पाइअभासा ववहारस्स भासा णत्थि, तओ इमाए भासाए अज्झअणस्स किं उवओअं?

**अज्झाविआ-** आहुणिआ मरहट्ठी भासा णाउं सुलहा। आहुणिअ-संतस्स णाणेसरस्स णाणेसरी वि मरहट्ठी पाइअभासाए रइआ एव। जआ तुमं पाईण-मरहट्ठि-भासा णाउं समत्था तआ तुमं लीलाचरिअं, णाणेसरी, रुप्पिणि-चरिअं च णाउं वि समत्थो होसि।

**अणुराहा-** आयरिआ! मरहट्ठी पाइअभासा कस्सिं काले वट्टित्था? किं सा जणभासा होत्था?

**अज्झाविआ-** आम। पाईणे काले मरहट्ठदेसस्स बहुजणाणं जणभासा मरहट्ठी पाइअं एव। 'महा रट्ठो' त्ति मरहट्ठदेसस्स अत्थो। अओ मरहट्ठी पाइअभासा महा-रट्ठस्स भासा आसी। पाईणकाले महा-रट्ठे राअउआणा-मज्झ-पएसाणं समावेसो वि होत्था। अओ मरहट्ठी

भासा पाईणे काले मरहट्ठ-राअउआणा-मज्झपएसाणं जणभासा हूआ।

**पडिमा –** आयरिआ ! मरहट्ठी पाइअभासाए विसिट्ठं किं ?

**अज्झाविआ–** ण सा केवला जणभासा, अवि उ गंथस्स भासा वि अत्थि। जइण-सेअंबरेहिं आअरिएहिं जइण-गंथ-लेहणं मरहट्ठी भासाए एव कअं। अओ सा गंथभासा जइण मरहट्ठी पाइअं णामेण पसिद्धा। तहा य आअरिएहिं हेमचंदेहिं पाइअवागरण-रअणासमए पहाणओ मरहट्ठी पाइअभासाए वागरणं एव णिबद्धं अत्थि।

**राहिआ –** आअरिए ! मरहट्ठी पाइअभासाए पमुहा पसिद्धा अ गंथा के संति ?

**अज्झाविआ–** इमाए भासाए अणेआ पसिद्धा गंथा गंथआरा अ संति। तेसु कइवआणि णामाणि साहेमि, जहा अ- हालसालिवाहणस्स गाहासत्तसई, पवरसेणस्स सेउबंधो, वप्पइराअस्स गउडवहो, कोऊहलस्स लीलावई, रामपाणिवाअस्स कंसवहो तहा अ विमलसूरीणं पउमचरिअमाइं। एए गंथाणं पढणेण अम्हाणं भासा तहा जीवणं उण्णअं होइ। गंथेसु जे अणुभवा णिबद्धा संति ते अम्हाणं जीवणं समिद्धं करेंति।

**रोहिओ –** इमेसु गंथेसु केवलं जइण-तच्चणाणं अक्खिअं किं?

**अज्झाविआ–** ण छत्ता। इमेसुं गंथेसुं पेमकहा, सुहासिआणि, जुज्झवण्णणं, रामकहा, कण्हकहा अवि वण्णिआ। केवलं तच्चणाणं णत्थि। सव्वाणि गंथाणि णाणवद्धणं मणोरंजणं च करेंति। गाहासत्तसई तु तक्कालीण-समाअ-सक्किईणं विसालो कोसो एव। वज्जालग्गगंथे विविहविसएसु जीवणोवओगी सुहासिआणि रइआणि कईहिं। तेसिं जणाणं विआरा णाउं एए गंथा अईव महत्तपुण्णा। अओ मरहट्ठी पाइअभासाए अज्झअणं अम्हाणं कए तु बहु आवस्सअं एव।

**सव्वे छत्ता –** अज्झाविए! धण्णवाओ। अहुणा अम्हे सव्वे तुम्हाणं समीवे उवविसिऊण मरहट्ठिं पाइअभासं पढिस्सामो। तुम्हे पाढिस्सह किं ?

**अज्झाविआ–** आम। सव्वे छत्ता कल्ले आगच्छंतु मम समीवे। वयं पाढारंभं करिस्सामो।

## सद्दत्था

**सिक्खिउं** – शिकण्याची
**मरहट्ठी पाइअभासा** – महाराष्ट्री प्राकृत भाषा
**कढिणा अत्थि?** – कठीण आहे का?
**अच्चंता सुलहा सरला अ** – अतिशय सोपी आणि सरळ आहे.
**ववहारस्स भासा** – व्यवहाराची भाषा
**किं उवओअं?** – काय उपयोग ?
**णाउं** – जाणून घेण्यासाठी, समजण्यासाठी
**णाणेसरस्स णाणेसरी** – ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी
**जणभासा** – लोकांची भाषा, बोली भाषा
**राअउआणा-मज्झपएसाणं** – राजपुताना व मध्यप्रदेशांचा
**पाईणे काले** – प्राचीन काळी
**जइण-सेअंबरेहिं आअरिएहिं** – जैन श्वेतांबर आचार्यांनी
**पाइअवागरण-रअणासमए** – प्राकृत व्याकरण लिहित असताना
**णिबद्धं**– रचले आहे
**हालसालिवाहणस्स गाहासत्तसई** – राजा हाल सातवाहनाची गाथासप्तशती
**पवरसेणस्स सेउबंधो** – प्रवरसेनाचे सेतुबंध
**वप्पइराअस्स गउडवहो** – वाक्पतिराजाचे गौडवध
**कोऊहलस्स लीलावई** – कुतूहल/कौतूहल याची लीलावती (कथा)
**रामपाणिवाअस्स कंसवहो** – रामपाणिवाद यांचा कंसवहो
**उण्णअं** – उन्नत/ विकसित
**समिद्धं** – समृद्ध
**जुज्झवण्णणं** – युद्धाचे वर्णन

**तच्चणाणं** – तत्त्वज्ञान (आत्मा व संसार याविषयीचे ज्ञान)
**तक्कालीण–समाअ–सक्किईणं** – त्याकाळातील समाज आणि संस्कृती यांचा

**महत्तपुण्णा** – महत्त्वाचे, महत्त्वपूर्ण
**आम (अव्यय)**– हो, ठीक आहे
**पाढारंभं** – शिकण्यास सुरुवात (करू)

## सज्झाओ

**१) माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) राहिआ– आअरिआ ! ...... अज्झअणस्स किं उवओअं ?
२) रोहिओ– इमे गंथा ...... बहु आवस्सअं एव।
३) पडिमा– आअरिआ ! ...... पसिद्धा अ गंथा के संति ?

**२) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) महाराष्ट्री प्राकृत भाषा कोणत्या प्रदेशाची जनभाषा होती?
२) ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी कोणत्या भाषेत लिहिली आहे?
३) हेमचंद्र यांनी कोणत्या भाषेचे व्याकरण लिहिले आहे?

**३) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) महाराष्ट्री प्राकृत ग्रंथांची नावे लिहा.
२) महाराष्ट्री प्राकृत ग्रंथांमधील विषय सांगा.
३) 'महाराष्ट्री प्राकृत भाषा जनभाषा होती', स्पष्ट करा.

**४) सविस्तर उत्तरे लिहा.**

१) महाराष्ट्री प्राकृत भाषेची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.
२) महाराष्ट्री प्राकृत भाषा शिकण्याचे महत्त्व तुमच्या शब्दांत मांडा.

**५) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) जआ तुमं पाईण–मरहट्ठी भासा णाउं समत्था, तआ तुमं लीलाचरिअं, णाणेसरी, रुप्पिणि–चरिअं च णाउं वि समत्थो होसि ।
२) अओ मरहट्ठी पाइअभासा महा–रट्ठस्स भासा आसी।
३) केवलं तच्चणाणं णत्थि ।

**६) योग्य शब्द निवडून तक्ता पूर्ण करा.**

सिक्खिउं, णाउं, उवविसिऊण, भाविऊण, रइआ, हूआ, होत्था, आसी.

| पूर्वकालवाचक | हेत्वर्थक | कर्म.भू. धा. वि. | भूतकाळ |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**७) जोड्या लावा.**

| गट अ | गट ब |
|---|---|
| १) लीलावई | अ) हालसालिवाहणो |
| २) गाहासत्तसई | ब) विमलसूरी |
| ३) पउमचरिअं | क) वप्पइराओ |
| ४) सेउबंधो | ड) कोऊहलो |
| ५) गउडवहो | इ) पवरसेणो |

**८) पाठातील महाराष्ट्री प्राकृत ग्रंथांची नावे लिहून रेखाजाल पूर्ण करा.**




**९) पाठातील महाराष्ट्री प्राकृत ग्रंथाचे विषय निवडून रेखाजाल पूर्ण करा.**



# २) ववहारकुसलो हालिओ

विजयकस्तूरसूरीश्वरजी यांचा जन्म गुजरातमधील पाटनगर येथे इ.स. १८९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अमीचंदभाई व आईचे नाव चंपाबेन होते. त्यांचे गृहस्थाश्रमातील नाव कांतिलाल होते. इ.स. १९१८ मध्ये त्यांनी दीक्षा घेतली व मुनी श्रीविजयकस्तूरजी या नावाने ते प्रसिद्ध झाले. त्यांनी 'प्राकृत रूपमाला', 'प्राकृतविज्ञानपाठमाला', 'श्री ऋषभनाथचरित्र' इत्यादी अनेक ग्रंथांबरोबर प्राकृतमध्ये श्रीचंद्रराजाचे चरित्र लिहिले. श्री विजयकस्तूरसूरीजी महाराज सतत शास्त्रांच्या चिंतनात मग्न असत. शिकविण्याची त्यांना आवड होती. अध्ययन-अध्यापनात तत्पर असल्यामुळे ते 'गुरुजी' या नावाने देखील प्रसिद्ध झाले. त्यांनी 'पाइअविन्नाणकहा' भाग १ व भाग २ हे कथासंग्रह महाराष्ट्री प्राकृत भाषेत लिहिले.

प्रस्तुत 'ववहारकुसलो हालिओ' हा पाठ 'पाइअविन्नाणकहा' भाग १ या कथासंग्रहातून घेतला आहे. या कथासंग्रहात एकूण पंचावन्न कथा आहेत. त्यापैकी ही पन्नासावी कथा आहे. या कथेत शेतकऱ्याच्या प्रभावी बुद्धीचे वर्णन आले आहे. शेतकरी आपल्या बुद्धिचातुर्याने राजाला कोड्यात टाकतो. आपल्या बुद्धिप्रभावाने शेतकरी राजाचा सन्मान कसा प्राप्त करतो, याचे रसाळ वर्णन या कथेत आले आहे.

णीए वि सुहकम्मेहिं, धीमंतो जायए कुले।
हालिएणावि बुद्धीए, रंजिओ भूमिपालओ।।१।।



को वि णरिंदो चित्तविणोयणत्थं णयराओ बाहिं विविहवणराइं पासंतो बहुदूरं गओ। तत्थ एगंमि खेत्ते किसिकम्मं कुणंतं हालियं पेक्खेइ, तं दट्ठूण पुच्छेइ - 'पइदिणं कियंतदव्वं अज्जेसि?', सो कहेइ - 'एगं रूवगं लहेमि'। तया णरिंदो कहेइ - 'तेण दव्वेण कहं णिव्वहेसि'? तेण वुत्तं 'तस्स रूवगस्स चउरो भागे करेमि, तत्तो एगं भागं अहं भक्खेमि, बीअं भागं उद्धारए देमि, तइअं अंसं रिणमोक्खत्थं वावरेमि, चउत्थं भागं कूवंमि पक्खिवामि।' एवं सुणिऊण तब्भावत्थं अजाणमाणो पुणो वि णरिंदो 'किं एयस्स रहस्सं' ति पुच्छेइ।



सो हालिओ वएइ- 'पढमेण भागेण अहं अप्पाणं णियभज्जं च पोसेमि। बीयभागेण पुत्ताणं भरणं कुणेमि, जओ ते वि पुत्ता वुड्ढत्तणंमि अम्हे पालिस्संति, तओ वुत्तं उद्धारगे देमि त्ति। तइअभागं मायपियराणमट्ठं वएमि, जओ हं बालत्तणे तेहिं पालिओ, तओ उत्तं रिणमोक्खत्थं वावरेमि। चउत्थं भागं परलोगसुहाय दाणे देमि, तेणुत्तं कूवंसि खिवेमि त्ति, जओ तं दव्वं परलोगंमि सुहाय होस्सइ'। एवं तस्स

अणुभवजुअं इहलोग-अच्चंतहियकारिणिं पर-लोगसुहावहं वायं सुणिऊण णरिंदो अईव तूसीओ। पुणो वि सो वएइ- 'हे करिसअ! तुम्हारिसेहिं मइमंतपुरिसेहिं च्चिय मम रज्जं विराएइ। अओ तुमं कहेमि- 'जाव सयहुत्तं मम मुहं दिट्ठं ण सिया, ताव तुमए एसा वट्टा कासइ ण कहियव्व' त्ति कहिऊण णरिंदो णियावासे गओ।

एगया सहाए वरसीहासणसंठिओ णरवरिंदो णिय-पहाणपुरिसाणमग्गओ हालिअस्स गूढवक्कस्स रहस्सं पुच्छेइ- 'जं एगं भागं भुंजइ, बीअं उद्धारके देइ, तइअं रिणमोक्खाय अप्पेइ, चउत्थं कूवंमि णिक्खिवेइ' 'तस्स को भावत्थो?'। एवं सुणिऊण सव्वे पहाणा पच्चुत्तरं दाउं असमत्था परुप्परं पेक्खेइरे। तया णरिंदेण कहियं- 'पण्णरसदिवसाणमब्भिंतरम्मि तुम्हेहिं एयस्स उत्तरं दायव्वं, अण्णह तुम्हे सव्वे दंडिस्सं' ति कहिऊण सहा विसज्जिआ।



ताणं पहाणाणं मज्झे एगो वियक्खणो पहाणो जणपरंपराओ णरिंदकिसीवलाणं मिलणपसंगं णाऊण तस्स करिसगस्स घरंमि गओ। तं किसीवलं तस्स वयणस्स रहस्सं पुच्छइ। बुद्धिमंतो हालिओ तं कहेइ- 'हे पहाणवर! सयहुत्तं णरिंदस्स मुहं जाव ण पासेज्जा, ताव इमस्स वयणस्स रहस्सं कस्स वि मए ण कहिअव्वं' 'एवं णरिंद-वयण-पासपडिबद्धो म्हि, तओ हं कहिउं कहं पारेमि?'। पहाणो वि तस्स वयणजुत्तिं इंगियागारेण णच्चा हालिअस्स पुरओ णरिंदपडिगिइ-अंकियसुवण्ण-मुद्दासयं ठवेइ। तया णरिंदागिइवंत-मुद्दासयं दट्ठूण तेण हालिएण तस्स वयणस्स रहस्सं जाणाविअं।

पक्खदिवसंते सहामज्झंमि पुणरवि णरिंदेण सो च्चिय पण्हो पुच्छिओ, तया सेसपहाणेसु मउणेण ठिएसु णरिंदस्स पुरओ तेण मंतिणा पच्चुत्तरं दिण्णं। तं सुणिऊण णरवरिंदो कहेइ 'तुमए अवस्सं हालिआओ एयं जाणियं सिया'। णरिंदो हालिअं बोल्लाविऊणं सक्कोहं पुच्छइ- 'कहं वयणभंगो कओ?' तेण वुत्तं 'मए वयणभंगो ण कओ, जओ पुव्वं मए सयहुत्तं सिरिमंताणं मुहं पासिऊण तस्स वयणस्स रहस्सं कहियं'। णरिंदो कहेइ- 'कया कत्थ वा मम मुहं दिट्ठं?' तया तेण णरिंदमुहंकियसुवण्णमुद्दासयं दंसिऊण कहियं 'एआसु सुवण्णमुद्दासु मुहं दिट्ठं' त्ति। तओ तस्स पच्चुत्तरदाणकुसलाए पण्णाए तुट्ठो णरिंदो तं मुद्दासयं तस्स च्चिअ देइ। एवं एसो हालिओ बुद्धिप्पहावेण रायमाणणिज्जो जाओ।।

उवएसो -

हालियस्स कह एयं, परत्थेह य सोक्खयं।
सुणिऊण 'भविया! तुम्हे, पयत्तेह जहासुहं'।।



## सद्दत्था

**हालिओ–** शेतकरी
**णीए वि –** स्वतःच्याच
**सुहकम्मेहिं –** शुभ किंवा चांगल्या कर्मांनी
**धीमंतो –** हुशार, बुद्धिमान
**जायए कुले –** (चांगल्या) कुळात जन्म घेतलेला
**हालिएणावि –** शेतकऱ्याने सुद्धा

**रंजिओ** – प्रसन्न केले
**भूमिपालओ /भूमिपालगो** – भूमिपालक, राजा
**चित्तविणोयणत्थं** – मन रमविण्यासाठी, मनोरंजनासाठी
**अज्जेसि** – मिळवतोस
**रूवगं** – रुपया
**लहेमि** – (मला) मिळतो
**णिव्वहेसि** – निर्वाह/चरितार्थ/उपजीविका करतोस
**उद्धारए** – उद्धार करणाऱ्याला
**अंसं** – अंश, भाग
**रिणमोक्खत्थं** – कर्जातून मुक्त होण्यासाठी
**कूवंमि/कूवंसि** – विहिरीमध्ये
**सुणिऊण** – ऐकून
**तब्भावत्थं** – त्याच्या भावार्थाला
**णियभज्जं** – स्वतःच्या पत्नीला
**पोसेमि** – (मी) पोसतो
**वएमि** – (मी) खर्च करतो, वापरतो
**इहलोगअच्चंतहियकारिणिं** – या लोकासाठी/इहलोकासाठी अतिशय लाभदायक
**परलोगसुहावहं** – परलोकासाठी सुखकर
**तूसीओ** – संतुष्ट झाला
**वएइ** – म्हणाला, बोलला
**सयहुत्तं** – शंभरवेळा
**वट्टा** – बातमी
**कासइ** – कोणालाही
**णियावासे** – णिय + आवासे– स्वगृही, स्वतःच्या घरी
**सहाए** – सभेमध्ये
**वरसीहासणसंठिओ** – उत्कृष्ट सिंहासनावर बसलेला
**गूढवक्कस्स** – गूढ किंवा रहस्यमय वाक्याचा
**णियपहाणपुरिसाणमग्गओ**–णियपहाणपुरिसाणं+अग्गओ– आपल्या मुख्य/महत्त्वाच्या मंत्र्यांसमोर
**भुंजइ** – उपभोग घेतो
**णिक्खिवेइ** – फेकतो
**पच्चुत्तरं** – प्रत्युत्तर, उत्तर
**परुप्परं** – पर + उप्परं– एकमेकांना/एकमेकांकडे
**पेक्खेइरे** – बघू लागले
**दायव्वं** – द्यायला हवे
**पण्णरसदिवसाणमब्भिंतरम्मि** – पण्णरसदिवसाणं + अब्भिंतरम्मि– पंधरा दिवसांच्या आत
**विसज्जिआ** – विसर्जित केली
**वियक्खणो** – हुशार, विद्वान, चतुर
**जणपरंपराओ** – लोकांकडून (एकाकडून दुसऱ्याला, दुसऱ्याकडून तिसऱ्याला, अशा पद्धतीने)
**णरिंदकिसीवलाणं मिलणपसंगं** – राजा आणि शेतकऱ्याच्या भेटीचा प्रसंग
**णाऊण / णच्चा** – जाणून
**ण कहिअव्व** – सांगू नये
**णरिंदवयणपासपडिबद्धो** – राजाच्या वचनरूपी पाशामध्ये अडकलेला
**वयणजुत्तिं** – बोलण्यातला गर्भितार्थ
**इंगियागारेण** – इशाऱ्याने/हावभावाने
**णरिंदपडिगिइअंकिय–सुवण्णमुद्दासयं**– राजाची प्रतिकृति/आकृती कोरलेल्या १०० सोन्याच्या मुद्रा/नाणी
**ठवेइ** – ठेवतो
**जाणाविअं** – जाणवून दिले, समजावून सांगितले
**पक्खदिवसंते** – पंधराव्या दिवसाच्या शेवटी
**सिया** – असणार/असेल
**बोल्लाविऊण** – बोलावून
**सक्कोहं** – रागाने, क्रोधपूर्वक
**रायमाणणिज्जो** – राजाने मान द्यावा असा
**परत्थेह** – परत्थ + इह– तिथे आणि इथे/परलोकात व इहलोकात

## सज्झाओ

**१) माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) को वि णरिंदो ...... ‘एगं रूवगं लहेमि’।
२) ताणं पहाणाणं ...... कहिउं कहं पारेमि ?।
३) णरिंदो हालिअं ...... रायमाणणिज्जो जाओ।

**२) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) शेतकऱ्याने प्रधानाला दिलेले उत्तर सांगा.
२) राजा शेतकऱ्यावर प्रसन्न झाला ते कारण सांगा.
३) राजा फिरत फिरत जिथे गेला ते ठिकाण सांगा.

## ३) थोडक्यात उत्तरे द्या.

१) राजा व शेतकरी यांचा संवाद लिहा.

२) शेतकऱ्याने धनाच्या/रुपयाच्या दुसऱ्या भागाचा केलेला वापर स्पष्ट करा.

३) प्रधानाने शेतकऱ्याकडून उत्तर जाणून घेण्यासाठी वापरलेली युक्ती स्पष्ट करा.

## ४) सविस्तर उत्तरे लिहा.

१) शेतकऱ्याने सांगितलेल्या धनाच्या भागांची विभागणी स्पष्ट करा.

२) 'ववहारकुसलो हालिओ' या पाठाचे सार सांगा.

३) राजाने सभेला विचारलेल्या प्रश्नाचे विवेचन करा.

## ५) संदर्भासह स्पष्टीकरण करा.

१) 'सयहुत्तं णरिंदस्स मुहं जाव ण पासेज्जा, ताव इमस्स वयणस्स रहस्सं कस्स वि मए ण कहिअव्वं?'

२) 'हे करिसअ ! तुम्हारिसेहिं मइमंतपुरिसेहिं च्चिय मम रज्जं विराएइ।'

३) एआसु सुवण्णमुद्दासु मुहं दिट्ठं ।

## ६ ) पाठातून योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.

१) एगंमि खेत्ते ........ कुणंतं हालियं ........ ।

२) ........ भागेण अहं अप्पाणं णियभज्जं पोसेमि ।

३) सुणिऊण 'भविया!........,पयत्तेह........'।

४) पहाणो वि तस्स वयणजुत्तिं........णच्चा हालिअस्स पुरओ ........ ठवेइ ।

५) एसो हालिओ........रायमाणणिज्जो जाओ ।

## ७) समास सोडवा.

१) भूमिपालओ –

२) परलोगसुहावहं –

३) जणपरंपराओ –

४) णरिंदपडिग्गिई –

५) सुवण्णमुद्दा –

## ८) प्राकृत समानार्थी शब्द द्या.

१) हालिअ – ४) णरिंद –

२) धीमंत – ५) मुह –

३) घर – ६) खेत्त –

## ९) प्राकृत विरुद्धार्थी शब्द लिहा.

१) सुह – ४) पच्चुत्तर –

२) हिय – ५) परलोय –

३) दिट्ठं – ६) जाणमाण –

## १०) विभक्त्यांप्रमाणे शब्द भरून तक्ता पूर्ण करा.

सुहकम्मेहिं, किसिकम्मं, हालिएण, विविहवणराइं, एगंमि, णरिंदेहिं, कूवंसि, परलोगंमि, णरिंदस्स, घरंमि

| तृतीया | सप्तमी | द्वितीया |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## ११) पाठातील योग्य विशेषणे निवडून रेखाजालचित्र पूर्ण करा.

१)




२)




३)




## १२) शेतकऱ्याने रुपयाचे चार भाग करण्याची कारणे.

# ३) अभयदाणं

हा उतारा हरिभद्रसूरींच्या 'समराइच्चकहा' या ग्रंथातून घेतला आहे. आचार्य हरिभद्रसूरी हे जैन आगमग्रंथांचे प्रसिद्ध टीकाकार असून ते इ.स. ८ व्या शतकात होऊन गेले. त्यांनी संस्कृत व प्राकृत अशा दोन्ही भाषांमध्ये ग्रंथ रचले. चित्तोड येथे राहणाऱ्या हरिभद्र यांनी जिनदत्तांजवळ दीक्षा घेतली. 'समराइच्चकहा' (समरादित्यकथा) ही त्यांची उत्कृष्ट धर्मकथा आहे. यामध्ये राजा समरादित्य आणि प्रतिनायक अग्निशर्मा यांच्या नऊ जन्मांची (भवांची) कथा आहे.

साहित्यकारांनी प्राकृत ग्रंथांमध्ये श्रावक किंवा गृहस्थांसाठी आहारदान, औषधदान, ज्ञानदान, अभयदान अशी चार प्रकारची महत्त्वाची दाने सांगितली असून त्यापैकी अभयदान हे सर्वात श्रेष्ठ आहे, हे या वेच्यात सांगितले आहे. फाशीसाठी नेल्या जात असणाऱ्या चोराला पाहून राणीला वाईट वाटते. राणी, चोराला अभयदान देण्याची, राजाला विनंती करते व तिच्या विनंतीमुळे पुढे काय घडले हे या कथेमध्ये दिले आहे.

अत्थि इहेव बंभउरं णयरं। तत्थ कुसद्धओ राया रज्जं करेइ। तस्स कमलुया महादेवी, तारावलि-प्पमुहाओ अण्ण-देवीओ। अण्णया राया वायायणोवविट्ठो समं कमलुया-पमुहाहिं चउहिं अग्गमहिसीहिं अक्ख-जूय-विणोएण चिट्ठइ। तओ अणेय-कसा-घाय-दूमिय-देहो बद्धो रज्जूए दंडवासिएण आणिओ तक्करो। भणियं च णेण- 'देव, कयमणेण परदव्वावहरणं।'



राइणा भणियं- 'वावाएहि एयं।'

पयट्टाविओ दंडवासिएण वज्झ-भूमिं। तओ पाण-वल्लहयाए अवलोइऊण दीण-वयणेण तीए दिसाए अक्कंदियमणेण- 'अहो, पढम-चोरकारी असंपत्त-मणोरहो वावाइज्जामि अहण्णो।'

एयमायण्णिऊण सोगियाओ देवीओ। विण्णत्तो ताहिं राया- 'अज्जउत्त, मा असंपत्त-मणोरहो वावाइज्जउ। अज्जउत्त-पसाएण किं पि करेमो एयस्स।'

अणुमअं राइणा, भणियं- 'करेह।'

तओ एगीए मोयाविऊण अब्भंगाविओ सहस्सपागेण, मद्दाविओ सप्पओयं, ण्हाविओ गंधोयगाहिं, दिण्णं च खोम-जुयलं। लग्गा दस-सहस्सा। भणिओ य तीए- 'एत्तियगो मे विहवो।'

अण्णाए काराविओ आसव-पाणं, भक्खाविओ विलंके, विलिंपाविओ जक्ख-कद्दमेणं, दिण्णं च कडि-सुत्तयं। परिच्चाओ वीसं सहस्साइं। भणिओ य तीए- 'एत्तियगो मे विहवो।'

अण्णाए भुंजाविओ कामियं, पायाविओ दक्खा-पाणगाइं, भूसाविओ दिव्वाहरणेहिं, दिण्णं च तंबोलं । लग्गो एत्थ लक्खो । भणिओ य तीए- 'एत्तियगो च्चिय मे विहवो' ।

मउलिया कमलुया। भणिया णरिंदेण- 'ण देसि तुमं किं चि?'



तीए भणियं 'अज्जउत्त, णत्थि मे विहवो एयस्स सुंदरयर-दाणे।'

राइणा भणियं- 'जीवलोय-सार-भूया मे तुमं। पहवसि ममं पाणाणं पि। ता कहं णत्थि?'

तीए भणियं- 'अज्जउत्त, महा-पसाओ। जइ एवं, ता देमि किंचि अहं अज्जउत्ताणुमईए।'

राइणा भणियं- 'एवं करेहि।'

भणिओ य कमलुया-देवीए चोरो- 'भद्द, दिट्ठो तए अकज्ज-बीय-तरु-कुसुमुग्गमो।'

तेण भणियं- 'सामिणि, सुट्ठु दिट्ठो। अओ चेव संजाय-पच्छायावो विरओ अहं जावज्जीवमेवाकज्जायरणस्स।'

देवीए भणियं- 'जइ एवं, ता दिण्णं मए इमस्स अभयं।'

राइणा भणियं - 'सुदिण्णं।'

हरिसिओ चोरो, मोइयं सुंदरयरं ति।

परितुट्ठा कमलुया। हसिअं सेस-देवीहिं। महादेवीए भणियं- 'किमिमिणा हसिएण?' एयं चेव पुच्छह 'किमेत्थ सुंदरयरं?' ति।

पुट्ठो चोरो। भणियं च णेण- 'मरण-भयाहिभूएण ण णायं मए सेसं ति ण याणामि विसेसं। संपयं पुण सुहिओ म्हि।'

'एवमेयं' ति पडिवण्णं सेस-देवीहिं।

## सद्दत्था

**तारावलिप्पमुहाओ** – तारावली ज्यात मुख्य आहे (अशा राण्या)

**अण्णदेवीओ** – इतर राण्या

**अण्णया** – एकदा

**वायायणोवविट्ठो** – खिडकीपाशी बसलेला

**अग्गमहिसीहिं (समं)**– पट्टराण्यांसह

**अक्खजूयविणोएण** – फाशांनी द्यूत खेळून मनोरंजन करीत असताना

**अणेयकसाघायदूमियदेहो** – चाबकाच्या (कसा) अनेक तडाख्यांनी (आघात) ज्याच्या शरीराला दुखापत (दूमिय) झाली आहे असा (देह असलेला चोर)

**दंडवासिएण** – कोतवालाने, फौजदाराने

**तक्करो** – चोर

**पयट्टाविओ**– वळविले, प्रवृत्त केले

**पाणवल्लहयाए** – प्राण/जीव प्रिय असल्याने

**अक्कंदियं** – आक्रोश केला, हंबरडा फोडला

**असंपत्तमणोरहो** – ज्याच्या इच्छा पूर्ण झालेल्या नाहीत असा

**वावाइज्जामि** – मी ठार मारला जात आहे

**वावाएहि** – ठार करा

**वज्झभूमिं** – फाशी देण्याची जागा

**अहण्णो** – कमनशिबी, हतभागी, दुर्दैवी

**आयण्णिऊण** – ऐकून

**सोगियाओ** – दु:खी झाल्या

**विण्णत्तो** – विनविले

**अज्जउत्तपसाएण** – आर्यपुत्रांच्या कृपेने, प्राचीनकाळी स्त्रिया पतीला संबोधून 'अज्जउत्त' असे म्हणत असत

**अणुमअं** – परवानगी दिली

**मोयाविऊण** – मुक्तता करून

**अब्भंगाविओ सहस्सपागेण** – हजार औषधींनी तयार केलेले तेल त्याला चोपडवून घेतले.

**मद्दाविओ सप्पओयं** – शास्त्रशुद्ध पद्धतीने मालीश करविले

**ण्हाविओ** – स्नान घालायला लावले

**गंधोयगाइहिं** – सुगंधी पाणी इत्यादीने

**खोमजुयलं** – रेशमी वस्त्रांची जोडी, उत्तरीय व अधोवस्त्र अशी जोडी

**लग्गा दससहस्सा** – दहा हजार (नाणी) लागले / खर्च झाला, 'लग्ग'चा प्रयोग मराठी प्रमाणे आहे

**एत्तियग्गो** – एवढा, एवढे, एवढी

**विहवो** – वैभव, ऐश्वर्य

**कराविओ** – करविले

**आसवपाणं** – फळांचा रस इत्यादी, कदाचित् या ठिकाणी औषधी काढा असाही 'आसव'चा अर्थ असू शकेल

**विलंके**– औषधीगुणयुक्त भोजन

**विलिंपाविओ** – लेप लावविला

**जक्खकद्दमेण** – एक प्रकारच्या औषधी सुगंधी लेपाने - कापूर, अगरू, कस्तूरी आणि कंकोल हे समभाग घेऊन तयार केलेला लेप किंवा मलम

**कडिसुत्तयं –** कडदोरा, करदोटा, करदोडा
**परिच्चाओ –** व्यय केले, खर्च केले
**भुंजाविओ –** जेवण/भोजन करविले
**पायाविओ –** प्यायला दिले, पिण्यास द्यायला लावले.
**दक्खापाणगाइं –** शक्तिवर्धक पेये इ.(द्राक्षे इ. पासून तयार केलेले)
**भूसाविओ –** अलंकृत केले, सजविले, सजवायला लावले (सांगितले)
**दिव्वाहरणेहिं –** उत्तम दागिन्यांनी
**लक्खो –** एक लाख (नाणी)
**पहवसि –** अधिकार गाजवतेस
**अणुमईए –** परवानगीने
**अकज्जबीयतरुकुसुमुग्गमो –** अयोग्य कृत्यरूपी बीजातून उगवलेल्या झाडावर उत्पन्न झालेले फूल
**सुट्ठु –** चांगल्या प्रकारे
**संजायपच्छायावो –** ज्याला पश्चात्ताप झालेला आहे असा तो
**विरओ –** परावृत्त झाला आहे असा
**जावज्जीवं –** जिवंत असेपर्यंत, तहहयात
**मोइयं सुंदरयरं ति –** चांगल्या प्रकारे सुटका झाली म्हणून
**परितुट्ठा –** संतुष्ट झाली
**याणामि –** जाणतो
**सुहिओ –** सुखी, समाधानी
**पडिवण्णं –** कबूल केले, मान्य केले

## सज्झाओ

**१) माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) अत्थि इहेव ...... परदव्वावहरणं।'
२) अण्णाए भुंजाविओ ...... एयस्स सुंदरयर-दाणे।'
३) परितुट्ठा कमलुया ...... सुहिओ म्हि।'

**२) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) राजाच्या नगरीचे नाव सांगा.
२) चोराची विशेषणे सांगा.

**३) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

१) 'भद्द, दिट्ठो तए अकज्ज-बीय-तरु-कुसुमुग्गमो।'
२) कयमणेण परदव्वावहरणं ।
३) ता देमि किंचि अहं अज्जउत्ताणुमईए।

**४) कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा पूर्ण करा.**

१) बंभउरं णयरं, तत्थ ..... राया रज्जं करइ। (कुसद्धओ, पालओ)
२) पयट्टाविओ ..... वज्झ-भूमिं। (दंडवासिएण, रक्खएण)
३) तओ एगीए मोयाविऊण ........ सहस्सपागेण । (अब्भंगाविओ, ण्हाविओ)
४) अज्जउत्त, णत्थि मे विहवो एयस्स सुंदरयर-.....। (दाणे, आसणे)

**५) कारणे लिहा.**

१) फौजदाराने चोराला पकडले –
२) दु:खी राण्यांनी चोराला न मारण्याची विनंती केली–

**६) एका शब्दात उत्तरे लिहा.**

१) राजाला ज्यांनी विनंती केली त्या –
२) ज्याच्या इच्छा पूर्ण झाल्या नव्हत्या तो –

**७) समास सोडवा.**

१) अणेयकसाघायदूमियदेहो –
२) परदव्वावहरणं –
३) वज्झभूमिं –
४) अकज्जबीयतरुकुसुमुग्गमो –

**८) प्रत्येकी दोन प्राकृत समानार्थी शब्द द्या.**

१) राया –
२) तक्करो –
३) वल्लहो –
४) कुसुमं –
५) साहू –
६) अग्गमहिसी –
७) तुट्ठ –
८) विरओ –

**९) प्राकृत विरुद्धार्थी शब्द द्या.**

१) सुंदर –
२) मलिण –
३) इत्थि –
४) कज्ज –
५) भय –
६) सुगंध –

**१०) रूपे द्या.**

१) बंभउर – प्रथमा बहुवचन –
२) राया – तृतीया एकवचन –
३) एग – स्त्रीलिंगी पंचमी एकवचन –
४) कद्दम – सप्तमी एकवचन –
५) महादेवी – षष्ठी एकवचन –
६) चोर – सप्तमी बहुवचन –
७) मणोरह – तृतीया बहुवचन –
८) रज्जु – द्वितीया एकवचन –

**११) खालील कोष्टक पूर्ण करा.**

| शब्द | मूळशब्द | लिंग | वचन | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| णयरं | | | | |
| कुसद्धओ | | | | |
| देवीओ | | | | |
| अग्गमहिसीहिं | | | | |
| रज्जूए | | | | |
| ताहिं | | | | |
| खोमजुयलं | | | | |
| मे | | | | |
| तुमं | | | | |
| पाणाणं | | | | |
| अहं | | | | |
| सामिणि | | | | |
| चउहिं | | | | |
| देवीहिं | | | | |

| शब्द | मूळधातू | पुरुष | वचन | व्याकरण |
|---|---|---|---|---|
| करइ | | | | |
| अत्थि | | | | |
| पयट्ठाविओ | | | | |
| वावाएहि | | | | |
| मोयाविऊण | | | | |
| अवलोइऊण | | | | |
| वावाइज्जउ | | | | |
| ण्हाविओ | | | | |
| काराविओ | | | | |
| देसि | | | | |
| पहवसि | | | | |
| करेहि | | | | |
| भणियं | | | | |
| दिट्ठो | | | | |
| परितुट्ठा | | | | |

**१२) संधी सोडवा.**

| | |
|---|---|
| एयमायण्णिऊण | |
| अक्कंदियमणेण | |
| अज्जउत्ताणुमईए | |
| कुसुमुग्गमो | |
| जावज्जीवमेवा–कज्जायरणस्स | |
| किमिमिणा | |
| किमेत्थ | |
| सुहिओम्हि | |
| मरणभयाहिभूएण | |
| वायायणोवविट्ठो | |

# ४) णाअसीलो मेहरो

'मणोरमाकहा' हा धर्मोपदेश-कथांचा संग्रह ग्रंथ आहे. हा ग्रंथ श्रीवर्धमानसूरींनी गुजरातमधील धंधुका या गावामध्ये इ.स. ११८३ मध्ये लिहिला. या ग्रंथामध्ये मनोरमेच्या चार जन्मांचे (भवांचे) वर्णन केले आहे. हे चार भवांचे वर्णन चार अध्यायांमध्ये (अवसरांमध्ये) केले आहे. यामध्ये एकूण ८० कथा आल्या आहेत.

प्रस्तुत उतारा धनगुप्ताच्या चार मुलांबद्दलचा आहे. या उताऱ्यामध्ये धनगुप्ताच्या मृत्यूनंतर त्याच्या चार मुलांमध्ये मालमत्तेवरून भांडणे होऊ लागली. ही भांडणे एक अशिक्षित गवळी आपल्या बुद्धिचातुर्याने कसे मिटवतो? ही हकीकत आपल्याला प्रस्तुत उताऱ्यातून दिसते.

अत्थि वंग-विसय-सारा मुत्तिवई णाम णअरी। तीए णअरीए लोग-ववहार-कुसलो पच्छिम-वए वट्टमाणो धण-धणदत्त-धणमित्त-धणचंदाभिहाणाणं चउण्हं पुत्ताणं पिआ धणगुत्तो सेट्ठी। सो जरा-जज्जरिअ-काओ, सूलाइ-तिव्व-रोगाभिभूओ पाण-संसए वट्टइ। मिलिआ सुहि-सयणा। भणिओ तेहिं सेट्ठी- 'धरमाणो चेव तहा करेहि जहा पुत्ताणं पच्छा विरोहो ण हवइ'। तेण भणिअं- 'तुम्ह साहेज्जेण एअं सिज्झइ'। तेहिं भणियं- 'सहाया वयमेत्थ पओयणे'। सेट्ठिणा भणिअं- 'जइ तो, संति अणेण चउसु वि कोणेसु मंदिरस्स चत्तारि कलसा। किज्जंतु पत्तेयं धणाइ-णामंकिआ। जस्स जत्थ णामयं सो चेव तेण लेअव्वो विसंवाए भवंतो सक्खिआ'। तहेव कअं। गआ सट्ठाणं सयणाइया।




अण्णया उवरओ सेट्ठी। कइवय-दिणेहिं कय-मय-किच्चा, विगय-सोगा, घर-कज्जाणि विचिंतिउमाढत्ता तणया। वच्चंति वासरा। कलहंति परोप्परं तेसिं जायाओ। तण्णिमित्तं ताण वि जायइ चित्त-खंडणा। अण्णम्मि दिणे भणिआ धणेण धणदत्ताइया- 'संपयं जइ पुढो हविज्जइ तो सोहणं'।

पडिवण्णं सव्वेहिं। सोहण-दिणे सुहि-सयण-समक्खं उक्खणिओ धणेण णिअ-णामंकिय-कलसो, जाव तत्थ धूली चेव केवलं। ठिओ अहो-मुहो लज्जाए। धणदत्तेण वि उक्खणिओ णिय-कलसो। तस्स पुण अट्ठीणि चेव केवलाणि। सो वि विलक्ख-वयणो सयण-जण-मुहाणि जोइउमाढत्तो। धणमित्तेण वि उक्खणिओ णिअ-कलसो। तत्थ वि वहियाओ चेव केवलाओ। सो वि संजाअ-विलक्खो ठिओ अहो-मुहो। धणचंदेण वि कड्ढिओ णियकलसो। सो पुण रुप्प-सुवण्ण-मणि-मोत्तिएहिं पडिपुण्णो दिट्ठो।

हरिसिअ-हिअओ, विअसिय-वअण-णअणो, कलसं गहाय गच्छंतो भणिओ धणचंदो धणाईहिं- 'वच्छ! कहिं गम्मइ? मुंच कलसं। सअल-साहारणो एस अत्थो। समभागेहिं कीरउ। किं ण अम्हे ताय-तणआ?' सो कहेइ- 'ताएण जं दिण्णं तं गिण्हह'। एवं तेसिं विसम-वयंताण जाअं भंडणं। णिवारिआ सुहि-सयण-वग्गेण धणाइणो- 'ण एत्थ तुब्भेहिं किं पि लहेयव्वं जीवंतेण वि सेट्ठिणा छिण्णो तुब्भाण ववहारो'।

परिभूयं अत्ताणं मण्णमाणा ते पंचउलमुवट्ठिआ। तेण वि विण्णाय-वुत्तंतेण णिवारिया। अमच्च-सामंत-रण्णा

वि 'जुत्तमेअं' ति णिवारिआ। 'ण एत्थ छिण्णो ववहारो' त्ति भणिऊण संचलिआ चउरो वि वसंतपुराभिमुहं। मग्गे समासण्ण-गोउले सव्वे ठिआ। दिट्ठो मेहरो णाम गोउलाहिवई। तेण पुच्छिआ, 'के तुब्भे? किं णिमित्तं वा इहागआ?' कहिओ तेहिं सव्वो वइयरो।

साहाविअ-मइ-विहवेण मेहरेण जंपिअं- 'ण तुम्हाण पिउणो एगस्स वि परिभवो कओ। णवरं जो जत्थ कुसलो, सो तस्स सामिओ समाइट्ठो। पढमो खेत्त-घर-हट्टाण। बीओ गवाइ-चउप्पयाण। तइओ कलंतराइ-दिण्ण-दविणस्स। चउत्थो 'बालो' त्ति काऊण रुप्प-सुवण्णाईण सामी कओ'।

संजाय-पच्चएण भणियं धणेण- 'घडइ ते वयणं। जओ कुसलो अहं घराइ-कज्जेसु'। बीएण भणिअं- 'अहं पुण चउप्पय-विसएसु'। तइएण भणियं- 'अहं उग्गाहणियाए'। 'अओ चेव ताएण एवंविहा कलसा कय' त्ति हरिसिय-मणसा समागया स-णअरं। समीव-संठिएण सुओ एस वइयरो पुरिसेण। कहियं रण्णो। बीय-दिणे सद्दाविओ मेहरो।

संभंत-चित्तो समागओ गहिऊण दहि-दुद्धाइ-पाहुडं। पणमिऊण णराहिवं णिविट्ठो। पुच्छिओ राइणा- 'कहिं तए एरिसो विवाअ-परिच्छेओ सिक्खिओ?' तेण भणिअं- 'महाराअ! रण्णे जायाणं, रण्णे चेव संवड्ढियाणं, कत्तो



सिक्खागमो अम्हारिस-पुरिसाण? साहाविआ मे मई।' सम्माणिऊण वत्थाईहि विसज्जिओ मेहरो।



## सद्दत्था

**वंगविसयसारा** – वंग प्रांतातील प्रमुख (नगरी)
**मुत्तिवई** – नगरीचे नाव
**पच्छिमवए** – उतारवयात, म्हातारपणी
**सूलाइ** – शूल इत्यादी. शूल हे रोगाचे नाव, पोटशूळ इत्यादी
**पाणसंसए** – आसन्न मरण अवस्थेत
**सुहिसयणा** – जवळचे स्वत:चे लोक / नातेवाईक (मित्र इत्यादी)
**किज्जंतु** – केला जावा
**लेअव्वो** – घ्यावा
**सक्खिआ** – साक्षीदार
**उवरओ** – निधन पावला
**कय-मय-किच्चा** – मृत्यूचे संस्कार (अंत्य-संस्कार) केलेले (ते)
**विगयसोगा** – शोक / दु:ख दूर झाले आहे असे ते
**जायाओ** – पत्नी (बहुवचनी शब्द)
**संपयं जइ पुढो हविज्जइ तो सोहणं** – आता आपण वेगळे झाल्यास उत्तम होईल.
**पुढो** – वेगळे
**पडिवण्णं सव्वेहिं** – सर्वांनी त्याचा स्वीकार केला.
**उक्खणिओ** – खणले
**अट्ठीणि** – अस्थि, हाडे
**विलक्खो** – लज्जित
**जोइउमाढत्तो** – (जोइउं + आढत्तो) पाहण्यास सुरुवात केली.
**वहियाओ (दे.)** – हिशोब लिहिण्याच्या वह्या
**साहारणो** – साधारण
**परिभूयं** – अपमानित
**मण्णमाणा** – मानणारे
**विण्णायवुत्तंतेण** – वृत्तांत/हकीकत जाणल्याने/जाणून घेतल्याने
**ववहारो** – तंटा, कलह, भांडण
**समासण्ण** – जवळच्या असलेल्या
**गोउलाहिवई** – गवळी-वाड्याचा प्रमुख
**वइयरो** – प्रसंग
**साहाविअमइविहवेण**– नैसर्गिक/उपजत बुद्धीच्या वैभवाने, अत्यंत हुशारीने
**परिभवो** – अपमान
**णवरं (अव्वय)**– केवळ
**हट्ट** – बाजार, दुकान
**गवाइचउप्पयाण** – गाय इ. चतुष्पाद प्राण्यांचा
**कलंतराइ** – व्याज इत्यादी
**दविणस्स** – संपत्ती, पैसे यांचा
**संजाय-पच्चएण** – योग्य काय आहे ते कळल्यामुळे
**उग्गाहणियाए** – वसुली, तगादा यांमध्ये
**पाहुडं** – भेट, उपहार

## सज्झाओ

**१) माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) अत्थि वंग-विसय-सारा ..... वयमेत्थ पओयणे'।

२) सोहण-दिणे ...... ठिओ अहो-मुहो।

३) परिभूयं अत्ताणं ...... वइयरो ।

४) संभंत-चित्तो ...... विसज्जिओ मेहरो।

५) हरिसिय-हियओ ...... तुब्भाण ववहारो'।

**२) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) 'मुत्तिवई' नगरीतील व्यवहारकुशल श्रेष्ठीचे नाव सांगा.

२) श्रेष्ठीने आपल्या मुलांच्या नावाचे कलश तयार करण्याचे कारण सांगा.

**३) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) 'ताएण जं दिण्णं तं गिण्हह।'

२) 'तुम्ह साहेज्जेण एअं सिज्झइ।'

३) 'घडइ ते वयणं। जओ कुसलो अहं घराइ-कज्जेसु'

**४) समास ओळखा.**

१) ववहारकुसलो -

२) पंचउलं -

३) गोउलाहिवई -

**५) जोड्या लावा.**

| अ गट | ब गट |
|---|---|
| १) पिआ | अ) गोउलाहिवई |
| २) धणं | ब) अट्ठिकलसो |
| ३) मेहरो | क) रुप्प-सुवण्ण-कलसो |
| ४) धणदत्तो | ड) पढमो पुत्तो |
| ५) धणचंदो | इ) धणगुत्तो |

**६) मराठी प्रतिशब्द द्या.**

१) रुप्प - .....

२) ववहार - .....

३) सेट्ठी - .....

४) कलस - .....

५) वहिया - .....

६) दविण - .....

**७) खालील शब्दांतून तीन अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.**

पिआ, गंतुं, ण्हाणं, पुप्फाइं, गिण्हिऊण, देवयापूयाणं, मालाओ, करेइ, सो, सा, आवणे(हट्टे), घराओ, य, णिग्गओ, गुंफेइ।

**८) धनगुप्ताच्या मुलांची नावे लिहून रेखाजाल पूर्ण करा.**




**९) या धड्यातील उपसर्गासहित शब्द शोधून उपसर्ग व धातू वेगळे करून लिहा.**

**१०) रूपे द्या.**

१) विलक्ख - पुलिंगी षष्ठी बहुवचन

२) उवरम - कर्मणि भूतकालवाचक धातुसाधित विशेषण, स्त्रीलिंगी तृतीया एकवचन -

३) भण - वर्तमानकाळ द्वितीय पुरुष बहुवचन -

४) लह - विध्यर्थक विशेषण -

५) कर - भविष्यकाळ तृतीय पुरुष एकवचन -

६) दिण - सप्तमी एकवचन -

७) मंदिर - षष्ठी एकवचन -

८) लज्जा - सप्तमी बहुवचन -

९) मोत्तिय - तृतीया बहुवचन -

**११) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) जह, तहा, जहा, वयण

२) वयणं, णयणं, कमलं, सीया

३) भट्ठो, हरिसिओ, लज्जिओ, हसित्था

४) कमला, णेहा, भाणुमई, धणदत्तो

# ५) चंडचूडस्स णियमो

देवेंद्रगणी ऊर्फ आचार्य नेमिचंद्रसूरी यांनी अकराव्या शतकात महाराष्ट्री प्राकृत भाषेमध्ये 'आख्यानकमणिकोश' या नावाचा त्रेपन्न गाथांचा छोटा पण महत्त्वाचा ग्रंथ लिहिला. आचार्य आम्रदेवसूरींनी या ग्रंथावर इ.स. ११३४ मध्ये चौदा हजार श्लोकप्रमाणाचा प्रचंड टीकाग्रंथ रचला. यात लोकव्यवहार, धर्म व उपदेशप्रधान अशा अनेक कथा समाविष्ट केल्या आहेत. सर्व कथा पद्यात असल्या तरी त्यामध्ये ही चंडचूडाची एकच कथा गद्यात आहे. या ग्रंथामध्ये १२७ आख्यानके (कथा) असून बहुतांश कथा प्राकृत भाषेत आहेत. काही कथा संस्कृत व अपभ्रंश भाषेतही रचल्या आहेत.

आम्रदेवसूरींनी या कथेच्या माध्यमातून जीवनातील व्रत किंवा नियम ह्यांचे महत्त्व पटवून दिले आहे.

अत्थि इहेव भारहे वासे सुहत्थलाभिहाणो णाम गामो। तम्मि अ एगो कुलपुत्तओ परोवहसणसीलो सहावकुडिलो चंडचूडाभिहाणो परिवसइ। अवरो वि तग्गिह-समीवे दुग्गयाभिहाणो कुंभआरो खल्लिहडओ। सो अ चंडचूडो पइदिणं पेच्छइ रविकिरणेसु झलझलायंतं तस्स खल्लिं। तं दट्ठूण सो दुग्गयं उवहसइ।

अण्णया एगो महामुणी सुहत्थलम्मि समागओ। चंडचूडो पासइ साहुसमीवे सावयाइजणं मज्ज-मंसाइ-णियमे गिण्हंतं। उवहासपरो सो तत्थागंतूणं पभणइ 'भो!



जइ एयारिसेहिं णियमेहिं धम्मो भवइ ता अहमवि एअस्स दुग्गयकुंभारस्स खल्लिं ण पेच्छामि ताव ण भुंजामि, मज्झ वि होउ एस णिअमो'। मुणिणा भणिअं 'जइ णिच्छएण परिपालेसि ता अत्थि फलं'। गहिओ अ अवण्णाए णिअमो, पालेइ अ तं तहा कल्लाणभायणत्तणेण सम्ममेसो।

अण्णया अ गओ सो कुंभयारो अणुग्गए चेव दिवसअरे मट्टियाखणणत्थं। जायमवरण्हं। सुइरं णिरिक्खिओ वि ण दिट्ठो कुंभआरो। दढपइण्णत्तणओ ण भुंजए एसो। पुच्छिओ भारिआए- 'किं ण भुंजसि?' भणियं च णेण- 'मए एरिसो णियमो अंगीकओ'। तीए पणयपुव्वमुवहसिओ- 'तुज्झ वि केरिसो णियमो?' तेण भणियं- 'भद्दे! मा भणसु एवं। पडिवण्णाणिव्वहणे केरिसं पुरिसत्तणं?' तओ तीए तस्स णिच्छअं जाणिऊण पुच्छियाणि दुग्गयमाणुसाणि। भणियं च तेहिं गओ मट्टिया-णिमित्तं खाणीए। तत्थेव गओ चंडचूडो तद्दंसणत्थं।

एत्थंतरे दुग्गओ मट्टियाखणणत्थं कुद्दालिआए पहारे देइ। एगप्पहारेण अ णिहाणभायणं खणक्खणेइ। 'दिट्ठो दिट्ठो' त्ति भणिऊण वलिओ चंडचूडो। दुग्गएण संकिएण 'णायमणेण' ति वालिओ। तेण वि चंडचूडेण भिउडिं वंकं काऊण भेसिऊण कुंभआरो भणिओ- 'मम पुव्विल्लएहिं एत्थ दव्वं णिहाणीकयासि'। तहवि कुंभारस्स दीणारसहस्सं दाऊण वसीकयं दविणजायं। जाओ य चंडचूडो दव्वपहावेण जणपूयणिज्जो। कुणइ अ चाय-भोग-विलासाइयं। सव्वजणा तस्स बहुमाणं देंति।

चिंतियं च तेण चंडचूडेण अणुभूय-णियमफलेण- 'अहो! मे पयइकुडिलत्तणं। अहो! मे पुरिसाहमत्तणं।



अहो! मे परलोयणिरवेक्खत्तणं। जेण मए सुतिक्खतुंडेण परमम्मवेहिणा सव्वजणा संताविआ। परोवआरणिरआ, समसत्तुमित्ता तारिसा साहुणो वि 'एए सुवड्डुया, असंबद्धभासिणो, भोगंतरायकारय' त्ति पावकम्मुणा णिंदिआ। एए वि सावआ जीव-दयापरायणा, असच्चवावारविरया, पर-दव्वावहारभीरुणो, सकलत्तसंतुट्ठा अपरिमिअ-परिग्गह-राइभोयण-मज्ज-मंसाइ-परिभोयणियत्त-चित्ता अयाणमाणेण मए उवहसिया। पेच्छ, मम उवहासपरस्स वि एरिसं, एत्तिअं णिअमफलं जाअं।'

तओ तेण तक्काले चेव दुवालसविहो सावयधम्मो गहिओ। अणंतरं मुणी होऊण मुणिधम्मं सम्मं पालेइ। आउक्खए पत्तो सो सग्गं। तओ चुओ कमेण पाविही परमपयं।

## सद्दत्था

**सुहत्थलाभिहाणो** – शुभस्थल नावाचे (गाव)
**परोवहसणसीलो** – दुसऱ्याची थट्टा करण्याचा स्वभाव असणारा
**सहावकुडिलो** – स्वभावाने दुष्ट असणारा
**खल्लिहडओ** – टक्कल असलेला
**झलझलायंतं** – झळाळणारे
**मज्जमंसाइणियमे** – मद्यमांस इत्यादी त्यागासंबंधीचे नियम
**गिण्हंतं** – घेत असताना
**परिपालेसि** – पाळशील, पालन करशील
**अवण्णाए** – तिरस्काराने, उपहासाने
**कल्लाणभायणत्तणेण** – कल्याणासाठी पात्र होऊ या हेतूने
**मट्टियाखणणत्थं** – माती खणण्यासाठी
**दढपइण्णत्तणओ** – कठोर प्रतिज्ञा घेतल्यामुळे
**तीए पणयपुव्वमुवहसिओ** – ती नम्रपणे खोचक हसली. (नम्रपणे उपहासाने तिच्याकडून (तो) हसला गेला) (कर्मणी रचना)
**पडिवण्णाणिव्वहणे** –पडिवण्ण+अणिव्वहणे–स्वीकारलेले पार न पाडण्यात/पालन न करण्यात
**कुद्दालिआए** – कुदळीने
**णिहाणभायणं** – खजिन्याचे पात्र/भांडे
**खणक्खणेइ** – खणखणले, वाजले
**वलिओ** – वळला, मागे फिरला
**वालिओ** – वळविले, परत बोलावले
**भेसिऊण** – घाबरवून/ भीती दाखवून
**पुव्विल्लएहिं** – पूर्वजांनी
**चायभोगविलासाइयं** – त्याग-भोग-विलास इत्यादी
**पयइकुडिलत्तणं** – स्वभावतः असणारा कुटिलपणा
**सुतिक्खतुंडेण** – धारदार मुखाने (वाणीने), दुखावणाऱ्या शब्दांनी
**परमम्मवेहिणा** – दुसऱ्याच्या मर्मावर (दुखऱ्या नसेवर) घाव घालणाऱ्या
**सुवड्डुया** – गलेलठ्ठ, जाडजूड
**भोगंतरायकारय** – भोग/विलास यामध्ये विघ्न निर्माण करणारे
**अयाणमाणेण** – न जाणता, अजाणतेपणाने
**दुवालसविहो** – बारा प्रकारची व्रते : (१) अहिंसा, (२) सत्य, (३) अचौर्य, (४) ब्रह्मचर्य, (५) अपरिग्रह, (६) दिग्व्रत, (७) देशावकाशिक, (८) अनर्थदंडत्याग, (९) भोगोपभोगपरिमाण, (१०) सामायिक, (११) प्रोषधोपवास, (१२) अतिथिसंविभाग
**सम्मं** – चांगल्या प्रकारे
**आउक्खए** – आयुक्षय, आयुष्य संपल्यावर
**चुओ** – च्युत झाला, इथे च्युत होवून असा अर्थ आहे
**पाविही** – प्राप्त करेल, मिळवेल

# सज्झाओ

**१) माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) अण्णया एगो ...... सम्ममेसो।
२) पुच्छिओ भारिआए ...... चंडचूडो तद्दंसणत्थं।
३) चिंतियं च तेण ...... मए उवहसिया।

**२) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) चंडचूडाच्या गावाचे नाव सांगा.
२) चंडचूडाने घेतलेले व्रत सांगा.
३) कुंभार कुदळ घेऊन कोठे गेला.
४) पाठात आलेले कुंभाराचे विशेषण सांगा.
५) चंडचूडाला नियमपालनाचे मिळालेले फळ सांगा.

**३) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) चंडचूडाने व्रत घेतले ती परिस्थिती स्पष्ट करा.
२) चंडचूड आणि त्याची पत्नी यांच्यातील संवाद मांडा.
३) चंडचूडाचा कुंभाराशी झालेला संवाद आपल्या भाषेत लिहा.

**४) सविस्तर उत्तरे लिहा.**

१) पाठाचा सारांश सांगा.
२) चंडचूडाने केलेले नियमपालन सांगा.
३) नियमपालनाचे फळ मिळाल्यामुळे चंडचूडाने केलेला विचार स्पष्ट करा.

**५) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) 'जइ णिच्छएण परिपालेसि ता अत्थि फलं' ।
२) दढपइण्णत्तणओ ण भुंजए एसो ।
३) 'मम पुव्विल्लएहिं एत्थ दव्वं णिहाणीकयासि' ।
४) मम उवहासपरस्स वि एरिसं णिअमफलं जाअं ।

**६) संधी सोडवा.**

१) सुहत्थलाभिहाणो –
२) तद्दंसणत्थं –
३) तत्थागंतूणं –
४) जायमवरण्हे –

**७) रूपे ओळखा.**

१) समागओ –
२) उवहसिओ–
